महाराष्ट्र शासन

नोंदणी व मुद्रांक विभाग

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे

तळमजला, नवीन प्रशासकीय इमारत, विधान भवन समोर, पुणे -411001

तळमजला, नवीन प्रशासकीय इमारत, विधान भवन समोर, पुणे -411001

नोंदणी व मुद्रांक विभाग

दुरध्वनी क्र.020-26138432 कार्यासन क्र.9 Email-do9.igro@igrmaharashtra.gov.in

**क्र.का.9/आस्था-3/शिपाई पदभरती/जाहिरात शुध्दीपत्रक/**1211 /2025. **दिनांक.** 13 /05/2025.

प्रति,

सहाय्यक संचालक (जाहिरात),
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
तळमजला, मंत्रालय, मुंबई-32.

**विषय**- जाहिरात क्र. 01/2025 चे शुध्दीपत्रक प्रसिध्द करणेबाबत.
**संदर्भ - क्र.का.9/आस्था-3/शिपाई पदभरती/जाहिरात**/998/2025
**दि.** 21/04/2025.

नोंदणी व मुद्रांक विभागातील **शिपाई गट-ड** संवर्गातील 284 रिक्त असलेली पदे भरतीबाबतची जाहिरात क्र. 01/2025 दि. 21/04/2025 संदर्भिय पत्रान्वये वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यासाठी विहित नमून्यामध्ये देण्यात आलेली होती व त्यानुसार ती वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेली आहे.

उक्त जाहिरातीमध्ये सोबत जोडलेल्या शुध्दीपत्रकान्वये दुरुस्ती करण्यात आलेली असून सदरचे शुध्दीपत्रक नमुना सोबत जोडलेला आहे. तरी सदरहू शुध्दीपत्रक राज्य स्तरावरील सर्वाधिक खपाच्या दि. 14/05/2025 रोजीच्या मराठी वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात यावे. सदरहू शुध्दीपत्रक जिल्ह्याच्या वृत्तपत्रातील पुरवणीमध्ये प्रसिध्द करु नये. शुध्दीपत्रकाचे देयक या कार्यालयास सादर करावे. सदर शुध्दीपत्रक संबंधित वृत्तपत्रात प्रसिध्दीसाठी सोबत चार प्रतीत पाठवीत आहे. तरी सदरचे शुध्दीपत्रक त्वरीत प्रसिध्द करावे.

प्रस्तुतचे शुध्दीपत्रक कोणत्या दिनांकास व कोणत्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे, त्याची संबंधित वृत्तपत्राच्या प्रतीसह माहिती या कार्यालयास पुरविण्यात यावी. म्हणजे देयक अदा करण्याच्या दृष्टीने पुढील कार्यवाही करणे सोईचे होईल.

सोबत – वरिलप्रमाणे.

का.प्र.मा.नों.म.नि.यांच्या सहिची असे.

**(उदयराज चव्हाण)**
**नोंदणी उपमहानिरीक्षक (मुख्यालय),**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

प्रत-1) मा.अपर मुख्य सचिव, महसूल,मुद्रांक शुल्क व नोंदणी व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-32 यांना माहितीसाठी सविनय सादर.

2) नोंदणी उपमहानिरीक्षक (संगणक),नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.
2/-प्रस्तुतचे शुध्दीपत्रक आपल्या विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

3) उपसंचालक (लेखा), नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे यांना माहितीस्तव.

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**नोंदणी व मुद्रांक विभाग**

**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालय**

**तळमजला, नवीन प्रशासकीय इमारत, विधान भवन समोर,पुणे ४११ ००१**

**संदर्भ - वाचा - जाहिरात क्रमांक - 01/2025 दिनांक 22.04.2025**

---

# शुध्दीपत्रक

**(जाहिरात क्रमांक 01/2025 दिनांक 22.04.2025)**

संदर्भिय जाहिरातीव्दारे महाराष्ट्र शासनाच्या नोंदणी व मुद्रांक विभागातील शिपाई (गट-ड) संवर्गातील रिक्त पदांवर नियुक्तीसाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात आले होते. सदर जाहिरातीमध्ये ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरावयाची व ऑनलाईन फी भरणेसाठीचा अंतिम दिनांक 10.05.2025 देण्यात आलेला होता.

तथापि, अर्ज भरावयाच्या शेवटच्या दिवशी अर्जांची संख्या जास्त प्रमाणात असल्याने ऑनलाईन फी भरणेसाठी काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याच्या तक्रारी मेलव्दारे या कार्यालयास प्राप्त झाल्या आहेत. तसेच अर्ज भरणेकामी मुदतवाढ मिळणेस विनंती अर्ज प्राप्त झाल्याच्या बाबी विचारात घेऊन, सदर जाहिरातीमध्ये या शुध्दीपत्रकाव्दारे ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरावयाची व ऑनलाईन फी भरणेसाठी दिनांक 14.05.2025 ते 16.05.2025 (23:59 वाजेपर्यंत) तीन दिवसाची वाढीव मुदत देण्यात येत आहे. त्या अनुषंगाने अर्ज व ऑनलाईन फी भरावयाची मुळ जाहिरातीमधील लिंक दि. 14.05.2025 पासून पुन्हा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तरी सर्व अर्जदार ज्याचे तांत्रिक अडचणीमुळे फी भरणेस अडचणी निर्माण झालेल्या आहेत, त्यांनी देखिल सदर कालावधीमध्ये अर्ज पुर्ण करावेत. त्यानंतर याबाबतच्या कोणत्याही विनंतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

मुळ जाहिरात क्रमांक 01/2025 मधील उर्वरीत अटी व शर्ती मध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही, परंतू दिव्यांग उमेदवाराकरिता लेखनिक व अनुग्रह कालावधी संदर्भात जाहिरात क्र. 01/2025 दि. 22.04.2025 मधील सूचना क्र. 10 दिव्यांग आरक्षण मधील मुद्दा क्रमांक (9)(2 व 3) मध्ये देण्यात आलेला लेखनिक संबंधी अर्ज करण्याचा अंतिम दिनांक 23.05.2025 पर्यंत राहिल.

का.प्र.मा.नों. म.नि.यांच्या सहिची असे

(उदयराज चव्हाण)
**नोंदणी उपमहानिरीक्षक (मुख्यालय),**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**